**ठळक बातम्या**

- ऑपरेशन सिंदूर ही भारताची दहशतवादविरोधातली आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई असल्याचं संरक्षण मंत्र्यांचं प्रतिपादन
- विधीमंडळ संमत विधेयकांवर कार्यवाहीसाठी राज्यपालांना समयसीमा देण्याचा  अधिकार न्यायालयाला आहे का? अशी राष्ट्रपतींची विचारणा
- महानगरपालिका निवडणुका लौकर घेण्याचा राज्यशासनाचा प्रयत्न असून या निवडणुका महायुती एकत्रच लढणार असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

  **आणि**
- खेलो इंडिया स्पर्धांचा आज समारोप

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूर ही भारताची दहशतवादविरोधातली आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई आहे, असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी आज केलं. ते आज जम्मू आणि काश्मीरच्या दौऱ्यासाठी श्रीनगर इथे पोहोचल्यानंतर संरक्षण दलांना संबोधित करत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरक्षा दलांनी ऑपरेशन सिंदूरमध्ये केलेल्या कामगिरीचा संपूर्ण देशाला अभिमान आहे. संरक्षण मंत्री आणि देशाचा नागरिक या नात्याने  सिंह यांनी संरक्षण दलांचे आभार मानले. ऑपरेशन सिंदूर हे एक नाव नसून ती आपली देशाच्या संरक्षणाप्रति असलेली वचनबद्धता आहे, असं ते म्हणाले….

**होल्ड - बाईट- राजनाथ सिंह**

राजनाथ सिंह यांनी यावेळी श्रीनगरमधल्या लष्कराच्या १५व्या कॉर्प्स मुख्यालयालाही भेट दिली आणि ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर तयारी आणि घडामोडींच्या सर्व पैलूंबद्दल माहिती घेतली.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याचा सन्मान, आणि शूरवीरांना मानवंदना देण्यासाठी भारतीय जनता पक्षातर्फे देशभरात तिरंगा यात्रा सुरु आहे. २३ मेपर्यंत ही यात्रा सुरू राहणार आहे.

बीड जिल्ह्यात परळी इथं आज भव्य तिरंगा रॅलीचं आयोजन करण्यात आलं आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव इथंही सैनिकांचं मनोबल वाढवण्यासाठी आणि हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी भव्य तिरंगा मशाल यात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने पाकिस्तानी झेंडे आणि संबंधित वस्तूंच्या विक्रीबद्दल Amazon India, Flipkart, Ubuy India, एटसी, द फ्लॅग कंपनी आणि फ्लॅग कॉर्पोरेशन यांना नोटीस बजावली आहेत. अशी माहिती केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी समाजमाध्यमावर दिली आहे. अशी असंवेदनशीलता खपवून घेतली जाणार नाही. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मना अशी सर्व सामग्री त्वरित काढून टाकण्याचे आणि राष्ट्रीय कायद्यांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. असंही त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. पुण्यातल्या सुका मेवा व्यापाऱ्यांनीही तुर्कीएमधून येणाऱ्या सुक्या मेव्यावर बहिष्कार टाकला आहे. पुणे मार्केट यार्ड परिसरातल्या व्यापारी संघटनेनं आधी देश नंतर व्यापार, अशी भूमिका घेतली आहे.

भारत पाकिस्तान संघर्षादरम्यान पाकिस्तानच्या बाजूनं उभं राहणाऱ्या तुर्कीएसोबतचा सामंजस्य करार जवाहरलाल नेहरु विद्यापीठ-जेएनयूनं रद्द केला आहे. तुर्कीएच्या इनोनू विद्यापीठासोबत केलेला करार भारताच्या सुरक्षेचा विचार

करुन रद्द करत असल्याचं जेएनयूनं म्हटलं आहे. अनेक पर्यटन कंपन्यांनीही तुर्कीए आणि अझर बैजानमधली नोंदणी रद्द केली, त्यामुळं तुर्कीएला जाणाऱ्या सुमारे १५ हजार प्रवाशांचीही नोंदणी रद्द झाली आहे.

<><><><><>

राज्यविधीमंडळानं मंजूर केलेल्या विधेयकांवर कृती करण्यासाठी राज्यपालांना समयसीमा  देण्याचा  अधिकार न्यायालयाला आहे का, अशी विचारणा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू  यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे केली आहे. तमिळनाडू विधानसभेने मंजूर केलेली विधेयकं राज्यपालांकडे दीर्घ काळ प्रलंबित राहिल्याप्रकरणी  दिलेल्या निवाड्यात सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं होतं की विशिष्ट कालावधीत राज्यपालांनी विधेयकांवर निर्णय घेतला पाहिजे. मुदत न पाळल्यास राज्यपालांची संमती गृहीत धरण्यात यावी असंही न्यायालयाने म्हटलं आहे.

त्यासंदर्भात १४ वेगवेगळे प्रश्न राष्ट्रपतींनी उपस्थित केले आहेत.  संविधानाच्या कलम २०० आणि २०१ मधे राज्यपालांच्या कार्यपद्धतीविषयीच्या तरतुदी आहेत, मात्र त्यात अशी समयसीमा पाळण्याबाबतचा उल्लेख नाही. तसंच हा निर्णय राज्यपाल आणि राष्ट्रपतींच्या संविधानदत्त शक्ती आणि अधिकारांवर अतिक्रमण करणारा आहे का, याचा विचार करावा असं राष्ट्रपतींनी आपल्या पत्रात म्हटलं आहे.

<><><><><>

वक्फ सुधारणा कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर २० मे रोजी सुनावणी होईल असं सर्वोच्च न्यायालयानं आज सांगितलं. याचिकाकार्त्यांचे वकील कपिल सिब्बल आणि सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी त्यांचं निवेदन १९ मे रोजी न्यायालयासमोर सादर करावं असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि

न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या पीठानं सांगितलं. १९९५च्या वक्फ कायद्यातल्या तरतुदींना स्थगिती देण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर कोणताही विचार केला जाणार नाही,  असं न्यायालयानं स्पष्ट केलं.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यात महानगरपालिका निवडणुका वेळेवर घेण्याचा राज्यशासनाचा प्रयत्न असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात प्रसारमाध्यम प्रतिनिधीना सांगितलं. या निवडणुका महायुती एकत्रच लढवणार असून कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार अपवादात्मक ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होतील असं ते म्हणाले.

**होल्ड--बाईट--मुख्यमंत्री**

मराठा आरक्षणाच्या संदर्भात राज्यसरकार लौकरच आपली भूमिका न्यायालयात मांडेल असं त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं.

प्रशासकीय सुधारणा आणि कार्यक्षमता वाढीच्या उद्देशाने राज्यशासन प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कार्यशाळा आयोजित करत आहे. त्यादृष्टीनं दीडशे दिवसांचा कार्यक्रम अधिकाऱ्यांना देण्यात आला आहे अशी माहिती फडणवीस यांनी दिली. महानगरपालिका अधिकाऱ्यांसाठीच्या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी मुख्यमंत्री पुण्यात होते.

पाकिस्तानला पाठिंबा देणाऱ्या तुर्किएच्या मालावर बहिष्कार टाकण्याच्या पुण्यातल्या व्यापाऱ्यांचं त्यांनी अभिनंदन केलं.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्याच्या मंडणगड तालुक्यातल्या टाकेडे गावात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ‘मिलन’ या  वृद्धाश्रमाचं उद्घाटन झालं.  पूर्वी कुटुंबव्यवस्था शक्तिशाली असल्यानं आपल्याकडे वृद्धाश्रम ही संकल्पना नव्हती, मात्र आता काही सामाजिक कारणांमुळे त्यांची गरज भासू लागली आहे, असं त्यांनी सांगितलं.. त्यादृष्टीनं राज्यात पहिल्या पाच वृद्धाश्रमांमध्ये स्थान मिळवू शकणारा प्रकल्प इथे उभा राहिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केलं. भारत हा आज युवा देश म्हणून ओळखला जातो. मात्र २०३५ नंतर देशातल्या वयस्कर व्यक्तींची संख्या वाढत जाणार असून त्यासाठी वयस्कर व्यक्तींच्या समस्या, त्यावरच्या उपाययोजना याकडे आतापासूनच लक्ष देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

**<><><><><>**

सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धांची आज सांगता होणार आहे. बिहारमधे पटना इथं पाटलीपुत्र क्रीडा प्रेक्षागृहात हा सोहळा होईल. केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी, इतर प्रशासकीय अधिकारी, क्रीडाक्षेत्रातले इतर मान्यवर या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र पदकतालिकेत ५७ सुवर्ण आणि ४७ रौप्य पदकांसह १५७ पदकं मिळवून अग्रस्थानी आहे. हरियाणाने जोरदार कामगिरी करत ३९ सुवर्ण आणि ३५ रौप्य पदकांसह एकूण ११६ पदकं मिळवून दुसरे स्थान पटकावलं. राजस्थान २३ सुवर्ण पदकांसह ५५ पदकं मिळवून तिसऱ्या स्थानावर आहे. महाराष्ट्रानं काल ॲथलेटिक्स    स्पर्धेत दहा सुवर्ण पदकांसह १५ पदकं मिळवत ऐतिहासिक कामगिरी केली.

**<><><><><>**

महाराष्ट्र सरकारचं अधिकृत संकेतस्थळ www.maharashtra.gov.in आणि सरकारी निर्णय-जीआर पोर्टल www.gr.maharashtra.gov.in नियमित देखभाल आणि तांत्रिक अद्यावतीकरणाच्या कामासाठी आज आणि उद्या दोन दिवस बंद राहील. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळानं ही माहिती दिली आहे. या कालावधीत अधिकृत सरकारी पोर्टलवर कोणत्याही सेवा उपलब्ध नसतील.

**<><><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यात श्रीरामपूर एमआयडीसी परिसरात पोलिसांनी काल रात्री केलेल्या कारवाईत कोट्यवधी रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले. या कारवाईत पोलिसांनी अन्न आणि औषध प्रशासनानं बंदी घातलेल्या अल्प्रझोलम या औषधासह १३ कोटी ७५ लाख ४१ हजार रुपयांचा माल जप्त केला. या प्रकरणी श्रीरामपूर पोलीस ठाण्यात दोन जणांविरोधात गुन्हा दाखल केला असून एका व्यक्तीला अटक केल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली.

**<><><><><>**

विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. दरम्यान, काही जिल्ह्यांत वादळी पाऊस झाला.

अकोला जिल्ह्यात मूर्तिजापूर आणि अकोट तालुक्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसामुळं काही ठिकाणी फळबागांना फटका बसला आहे.

सांगली जिल्ह्यातील अनेक तालुक्यांना मुसळधार पावसानं झोडपलं. तर राज्यात काल सर्वाधिक ४२ पूर्णांक दोन दशांश सेल्सिअस तापमान ब्रह्मपुरी इथं नोंदवलं गेलं.